माझ्या सासूबाई कुमुताइ

– जयंत नारळीकर

काही व्यक्ती अशा असतात की प्रथम दर्शनीय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप आपल्यावर उमटते. कुमुताईंना पाहिल्यावरच जाणवले की ही बाई करारी - जिद्दीने आपले उद्दिष्ट गाठणारी ! पुढे अनेक प्रसंगी याचा प्रत्यय आला. तसे हे दोन प्रसंग.

१९७० साली मी आणि माझी पत्नी सौ. मंगला केंब्रिजमध्ये वास्तव्य करून होतो. आमच्या पहिल्या अपत्याची चाहूल लागली होती. त्यासाठी मदतीला कुमुताई आमच्याकडे यायला निघाल्या होत्या. विमान कंपनीच्या वजनाच्या मर्यादेत बसेल तेवढे सामान बरोबर घेऊन झाले होते. पण जावयासाठी खास खाऊ म्हणून हपूस आंबे - ते ही फेब्रुवारीच्या शेवटी मिळणारे दुर्मिळ असे - बरोबर न्यायची त्यांची तमन्ना होती. सामानात त्यांना जागा नव्हती आणि हॅण्ड बॅगेज मध्ये वाजवी पेक्षा जास्त गोष्टी भरल्या तर आयत्यावेळी विमान कंपनी त्या बाहेर काढायला लावतील. तेव्हा उगाच अशा भानगडी करू नका म्हणून मंगलाच्या काकांनी आधीच बजावले होते. अशावेळी त्यांच्या आणि विमानकंपनीच्या तीक्ष्ण नजरेला चुकवून त्यांनी ते आंबे सुखरुप केंब्रिजमध्ये माझ्या स्वाधीन केले. ही किमया त्यांनी कशी साधली ? त्यांनी ते आंबे आपल्या (नऊ वारी) साडीच्या ओच्यातून लपवून आणले होते !

१९ व्या साली भारत-चीन दरम्यान झालेल्या वाटाघाटींनुसार चीन ने कैलास-मानसरोवर ही पवित्र स्थळे भारतीय यात्रेकरूंसाठी खुली केली होती. यात्रा बरीच खडतर होती आणि सुरुवातीच्या काळात प्रवाशांसाठीच्या सोयी अगदी प्राथमिक दर्जाच्या होत्या. त्या पहिल्याच वर्षी ही यात्रा करायचा निर्धार कुमुताईंनी व्यक्त केला. भारतातील सर्व प्रमुख तीर्थस्थाने त्यांनी पाहिली होती. जरूर तेथे पायी वाटचाल केली होती. पण आता साठी जवळ आलेल्या कुमुताईंना ही यात्रा झेपेल का असे आम्हा सर्वांना वाटत होते. भारतीय सरकारी डॉक्टरने देखील शंका व्यक्त केली होती. पण मी ही यात्रा व्यवस्थित करेन, तुम्ही काळजी करू नका अस ठणकावून सांगून कुमुताईनी ही यात्रा यशस्वी करून दाखवली.

अशा ह्या माझ्या जिद्दी सासूबाई !